महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : सीएमए-०४२३/सी.आर.०१/२०२३/जाहिरात दिनांक : १७ मार्च, २०२३

# - : शुद्धिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३ (जाहिरात क्रमांक - ११/२०२३) — सहायक आयुक्त अन्न गट-अ संवर्गाच्या पदभरतीबाबत**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३ (जाहिरात क्रमांक ११/२०२३) मधून भरावयाच्या विविध संवर्गाकरीता दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. पदे विज्ञापित झाल्यानंतर शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे अन्न व औषध प्रशासन सेवेतील सहायक आयुक्त अन्न, गट- अ संवर्गाचे मागणीपत्र प्राप्त झाल्यामुळे सदर मागणीपत्राद्वारे प्राप्त पदांचा समावेश अन्न व औषध प्रशासकीय सेवेमध्ये करण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:- :-

| **(पाच)अन्न व औषध प्रशासकीय सेवा परीक्षा —वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :-** | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सहायक आयुक्त अन्न, गट-अ (एकूण ०८ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | १ | १ | -- | -- | १ | १ | १ | -- | १ | ६ | २ | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | १ | १ | १ | -- | १ | ६ | १ | ७ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

**३.** शैक्षणिक अर्हता:-

**(१)**रसायनशास्त्र विषयासह विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट पदवी किंवा अन्न तंत्रज्ञान किंवा डेअरी तंत्रज्ञान किंवा जैव तंत्रज्ञान किंवा तेल तंत्रज्ञान किंवा कृषी शास्त्र किंवा वैद्यकीय शास्त्र किंवा जैव रसायन किंवा सुक्ष्मजीवशास्त्र किंवा रसायन शास्त्र किंवा वैद्यकशास्त्र या विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट .

**किंवा**

**(२)**केंद्र शासनाच्या मान्यतेने अन्न प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या समतुल्य किंवा मान्यताप्राप्त अर्हता.

**४.** दिव्यांग सुनिश्चिती:-

शासन निर्णय ,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग , क्रमांक: एफडीएस-२०२१/प्र. क्र. ३८/२१/औषधे-१, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये प्रस्तुत संवर्गाकरीता पात्र दिव्यांगत्वाचे उपप्रकार खालीलप्रमाणे आहेत:-

(१) LV
(२) D, HH
(३) OA , BA, OL, BL, OAL, LC, DW, AAV, MDY
(४) MI
(५) MD involving to १ to ४ Above

**५.** जाहिरातीस अनुसरून यापूर्वीच अर्ज सादर केलेले तसेच अन्न व औषध प्रशासकीय सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी, गट- ब संवर्गाकरीता विकल्प दिलेले उमेदवार प्रस्तुत सहायक आयुक्त अन्न, गट- अ संवर्गाकरीता अर्हताप्राप्त ठरत असल्यास त्यांचा सहायक आयुक्त अन्न, गट- अ संवर्गाकरीता विकल्प ग्राह्य धरण्यात येईल. तथापि सहायक आयुक्त (अन्न), गट-अ करीता अर्हताप्राप्त ठरत असलेल्या उमेदवारांनी अर्ज

सादर करताना अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब संवर्गाकरीता विकल्प दिला नसेल आणि आता सहायक आयुक्त (अन्न) गट-अ संवर्गाकरीता पात्रतेनुसार विकल्प देण्यास इच्छुक असतील अशा उमेदवारांनी यापूर्वी सादर केलेला अर्ज रद्द करून परीक्षा शुल्कासह नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**६.** पदसंख्येत/आरक्षणात वाढ/बदल झाल्यास याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**७.** जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग